# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

## सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३

# महसूल व वन विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ५४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**रूपये:- ७,४१,१२,३१,०००/-**<br>**श्री. अबू आजमी** |
| (१) | ५५६० | १० | "मुंबई स्थित मानखुर्द – मंडाळा येथील खाडीलगत टाकाऊ तेलाचा साठा करून त्याची विक्री करण्यात येत असल्याचे व उर्वरित पदार्थ खाडीत टाकून पर्यावरणाला धोका पोहचवण्याचा प्रकार सुरु असल्याचे ९ जानेवारी, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पोलीस पथकाने कुर्ला स्क्राप मंडाळा, खाडीलगतच्या ठिकाणी छापा टाकला असता पोलिसांनी काळ्या तेलाने भरलेले १९५ ड्रम व १०० मोकळे ड्रम जप्त केले असता ड्रममधील पदार्थ आरोपी खाडीत ओतून देत असल्याचे हि निदर्शनास येणे, तसेच दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजी कुर्ला स्कराप येथे मोठ्या प्रमाणात रासायनिक कारखान्यांमुळे भयानक आग लागणे, सदर भीषण आगीमुळे झोपडे जळणे व आग नियंत्रित आणतांना अग्निशामक दलाचे ५ जवान जखमी झाल्याचे हि निदर्शनास येणे, सदर शासनाच्या जागेवरील कुर्ला स्क्राप ची लीज उलटूनही तेथे अवैधरीत्या रासायनिक कारखाने सुरु असल्याने वारंवार विभागात आग लागणे व सदर विषयी सर्व स्तरावर प्रशासनाला वारंवार सदर बाब निदर्शनास आणून देखील अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई कारण्यात न येणे, सदर विषयी शासनाने संबंधितांवर केलेली वा कारण्यात आलेली कारवाई, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (२) | ५७०० | १० | मौजे कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १९३ मध्ये नाथा गोवर भोकरे, गोपाळ लडकु मुकादम यांनी महसुत खात्याच्या ई या महसूल अभिलेखात बेकायदेशीर अभिलेख ताब्यात घेऊन तात्कालीन तलाठी यांच्या मदतीने नावे नोंदवून घेतले या लोकांचे कधीही जमिन मिळकतीत अतिक्रमण नसतांना बनावट कागदपत्राद्वारे बनावट फेरफार बनावट सातबारे घडवुन आणले इतकेच नव्हे तर बनावट बिनशेती परवानगी बनवल्याप्रकरणी विनोद गोपाळ मुकादम यांच्यावरती नारपोली पोलिस स्टेशन हरीत कलम ४२० खाली गुन्हा दाखल झालेला आहे. विनोद मुकादम ही व्यक्ती महसुल अभिलेखातील जुन्या नोंदीत अधिकाऱ्यांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | हाताशी धरून छेडछाड व फेरफार करत असून स्वतःचा कब्जा दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे १-ई अभिलेखात असलेले नाथा भोकरे व गोपाळ मुकादम हे बोगस व बनावटरीत्या नोंद झाल्याने त्याची चौकशी होणे आवश्यक आहे तर सदर जमिनीमध्ये १ ई च्या अभिलेखामध्ये मुळ खातेदार बाळु राघो तरे असुन त्यांचे अतिक्रमण हे सन १९५० पासून असल्याचे शासनाच्या महसूल अभिलेखातील नोंदीप्रमाणे निदर्शनास आलेले आहे त्यानी जमिन नियमाकुल करण्यासाठी शासनाला अनेक वेळा निवेदन दिलेले असुन त्यांची जमिन नियमाकुल करण्यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे नियमिततेप्रमाणे व गुणवत्तेप्रमाणे तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता आहे त्यानुसार शासनाने योग्य ती करावयाची कारवाई. |
| (३) | ५७२९ | १० | मौजे कोलिवली गाव, ता. भिवडी, जि. ठाणे येथील सक्रम १०६.२४/०७/२०१२ रोजी दिवाणी न्याय के स्तर भिवंडी यांनी आमच्या नोव कायदेशीर काम असल्याचे घोषित कर प्रमाण (Succession certificate) प्रमाणे वारस दाखला दिलेला असुन खरी वस्तुस्थिती सर्व जमिन कानू रामा गुरव (द) भागबाई मंगळा म्हात्रे (मुलगी मयत व हिचे सर्व खाली दिलेले वारस असल्यामुळे या सर्वांची नावे जमिन मिळकतीमध्ये २०१२ सालीच तात्कालीन तलाठी यांनी सातबाऱ्यावर लावायला पाहिजे होते. परंतू तहसिल कार्यालयातील विवादग्रस्त प्रकरण फेरफार क्रं. २००५ मध्ये आपल्या तलाठी विभागाकडून फक्त सर्व्हे क्र. १०६/५ एवढाच सातवान्यावरती नावे नोंदवण्यात आले दिवाणी न्यायालय यांच्या आदेशाचे पालन झालेले नसल्याने दिवाणी न्यायालय भिवडी का स्तर यांचा २०१५ चे कालीन तलाठी यांनी अवमान केल्याचे दिसते आणि त्यानी न्यायालयाबरोबर व शेतकन्यांबरोबर बनाव करून दुसरे वारस कुटूंबदारांना गैरलाभ पोहोचावा म्हणून गैरकायदेशीर खटाटोप झालेला आहे. दिवाणी न्यायालय यांचे आदेशाचे कुठेही अवमान होऊ नये म्हणून याची दक्षता तलाठी अधिकारी म्हणून घेणे आवश्यक होते अन्यथा दि. २३/२०२३ व दि. ८/३/२०२३ च्या तहसिलदार येथे नागरीकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व दिवाणी न्यायालय कस्तर भिवडी यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र दाखल्यानुसार नावे दाखल न केल्याने शासनाने वारंवार होत असलेले न्यायालयीन अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द कठोर ती कठोर उपाययोजना करून न्यायालयांची अमलबजावणी तात्काळ होणेकामी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. |
| (४) | ५७३५ | १० | मौजे काकडी, ता. कोपरगाव येथील दुय्य निबंधक ह्यांचेकडे खरेदीदस्त १०१४/२०१५ नुसार सुनिल मारुती ढोली ह्यांनी खरेदीने घेतली होती. सदर खरेदीदस्ताचे दुय्यम निबंधक ह्यांनी E-फेरफारासाठी तलाठी-काकडी ह्यांना संगणकप्रणालीद्वारे E-चावडी व प्रसिध्द होणे पाठविले नाही असे तलाठी सांगत असून दोन्ही अधिकारी बनवाबनवी करत आहे व पैसे उकळणाच्या उद्देशाने गैरलाभ मिळावा म्हणून दुय्यम निबंधक व तलाठी यानी E- फेरफार E- चावडी प्रमाणे कायदेशीर कारवाई न केल्याने सदर जमिन मिळकतीत थर्ड पार्टी इटरेस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | क्रिपेट होऊन कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार महसूल खाते तलाठी व मंडळ अधिकारी राहतील ह्यांची नोंद घ्यावी, दस्त क्र. १०४७/२०१५ वरुन आमचे दस्त क्र. २४८४/२०१५ -फेरफार चावडी वर प्रसिद्ध करणे गरजेचे आहे, त्यानंतर माझे दस्त क्र. २४८४२/२०१२ व इतर ह्यांचे खालीलप्रमाणे फेरफार चावडी - प्रसिध्द करणे सोबत इतर लोकांची दस्त झालेली लिस्ट जोडली असुन त्याप्रमाणे कारवाई तात्कार करण्यात यावी आणि वरिष्ठांची तसे दुय्यम निबंधक - कोपरगाव व तलाठी-काकडी-कोपरगाव ह्याना - फेरफार नोंदवण्यासाठी दि. ९/३/२०२३ रोजी जिल्हाधिकारी व मुद्रांक जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे तक्रार दिलेली असून तक्रारीवर कारवाई होण्यासाठी शासनाने अहवाल मागवून तुर्त करावयाची कारवाई. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (५) | ५४३७ | १० | तिवसा ता, जि. अमरावती येथील राष्ट्रीय महामार्गालगत असलेलया दलित वस्तीतील २५ कुटूंबाना सार्शी मार्गावर असलेल्या शासकीय जागेवर २००६ साली सरकारकडून ताबापावत्या देऊन भूखंड वाटप करण्यात आले असणे, मात्र हे भूखंड अजूनपर्यत या कुटूंबाच्या नांवे झालेले नसणे, उक्त कारणास्तव प्रशासनाकडे निवेदनद्वारे भूखंड नांवावर करण्याची मागणी केलेली असणे, परंतू अद्यापही याबाबत उचित कार्यवाही झाली नसल्याने या नागरिकांमध्ये चीड निर्माण झाली असणे, याबाबत २५ कुटूंबांच्या नावावर भुखंड करण्याबाबची शासनान करावयाची कार्यवाही. |
| (६) | ५४४४ | १० | तिवसा येथे सन 2015-16 मध्ये तिवसा नगरपंचायतची निर्मिती करण्यात झाली असणे, त्यावेळी नगरपंचायतचा प्रशासकीय कामकाज हे जुन्या ग्रामपंचायत कार्यालयातून चालत असणे मात्र ती जागा अपुरी पडत असल्यामुळे पुन्हा जागेअभावी इतरत्र नगरपंचायत कार्यालय स्थलांतरीत करण्यात आली परंतु ही जागा सुद्धा नगरपंचायतच्या प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने व तिवसा शहराच्या वाढलेल्या लोकसंख्येनुसार नगरपंचायतचे प्रशासकीय कामकाज चालविणे याजागेत सुद्धा अशक्य होत असणे त्यामुळे अनेक अडचणी व समस्या निर्माण झालेल्या त्यादृष्टीने तिवसा येथील तहसिल कार्यालय हे नविन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरीत झाली असणे, जुनी तहसिल कार्यालयाची जागा पडून असल्यामुळे सदर जागेची नगरपंचायतला देण्याबाबत वर्ष 2016-17 पासून मागणी केलेली असणे परंतु अद्यापही त्याबाबत मंत्रालय स्तरावर हा प्रस्ताव प्रलंबित असणे, करीता तहसिल कार्यालयाची जागा नगरपंचायतच्या नविन इमारत निर्मितीकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. शेखर निकम** |
| (७) | ५४१४ | १०० | चिपळूण संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील चिपळूण तालुक्यात पेढे परशुराम देवस्थान असून या गावातील शेतकऱ्यांना, जमिनीचा कूळ कायदा शासनाने संपुष्टात आणलेला असताना देखील सन 1972 मध्ये तेथील शेतकऱ्यांच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर मात्र देवस्थानच नाव लावण्यात आल्याचे निदर्शनात आले आहे. तत्कालीन महसूल मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत दि.03/03/2019 रोजी बैठक होऊन त्यामध्ये संबंधित देवस्थान व खोतांना प्रत्येकी 10 टक्के व शेतकरी कुळांना 80 टक्के मोबदला देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्याबाबतचे आदेश अद्याप निर्गमित झालेले नाहीत. गेली अनेक वर्ष हा प्रश्न प्रलंबित असून पेढे परशुराम गावातील सातबाराच्या उताऱ्यावर शेतकऱ्यांची नावे लावणेसंदर्भात शासन स्तरावर तातडीने सकारात्मक धोरण व्हावे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (८) | ५३८३ | १० | मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील मे ओशिवरा लँड डेव्हलपेंट कंपनी प्रा. लि. या कंपनीच्या ताब्यातील क्षेत्रावर नागरी जमीन कमाल धारणा कायदा कलम २० अन्वये गृहबांधणी प्रयोजनार्थ विकासकाला सूट देण्यात येते, त्यानुसार विकासकाला सूट दिली असणे, मौजे ओशिवरा ता अंधेरी येथील सर्व्हे क्र. ४१ येथील क्षेत्रावर विकासकाकडून अनियमितता झाली असणे, विकासकाने उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील सदनिका बांधणे आवश्यक असणे मात्र विकासकांनी सदनिका बांधल्या नसणे, त्या संदर्भात विकासकावर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी (नाजका) व संबधित अधिकारी अहवाल देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असल्याचे स्पष्ट झाले असणे, नागरी जमीन (कमाल धारणा विनियमन) अधिनियम, १९७६ व्या कलम ३४ अन्वये सदनिकाच्या आकारमानाबाबत जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी या कार्यालयाच्या अधिका-यांनी सयुंक्तरीत्या बारकाईने पहाणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, तथापि या ठिकाणी तसे घडत असल्याचे दिसून येत नसणे, शासनास अहवाल सुध्दा सादर केला नसणे, जिल्हाधिकारी कार्यालय व शासनाचे संबधित अधिकारी विकासकाला मदत करीत असणे, संबंधित अधिका-यांव व विकासकाचे संगनमत असणे, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, विकासकावर कोणतीच कार्यवाही होत नसणे, याला तिन्ही यंत्रनेतील अधिकारी जबाबदार असणे, या कामात दिरंगाई व कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी शासनाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असणे, याबाबत स्थानिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासना प्रती निर्माण झालेली विडीवी भावना या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची उपाययोजना प्रतिक्रिया. |
| (९) | ५३८५ | १० | मढ मच्छिमार सर्वोदय सोसायटी लि. मालाड पश्चिम, मुंबई या संस्थेची जागा सर्व्हे क्र.५, ५/१, ५/७ ते ५/१४ पर्यंतची १७,४६९.६० चौ.मी. सर्व्हे क्र.१९५ ची ११४९.६० सर्व्हे क्र. १९६, १९६/१ ते १९६/३ ची १११०.७० चौ.मी. व सर्व्हे क्र. १९९ ची १६४.५० चौ.मी. अशी संस्थेची जागा शासनाने नागरी जमीन कमाल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | धारणा कायद्यान्वये संपादित केली असणे, तथापि, संस्थेने मा. उच्च न्यायालयात दाद मागितली असणे, मा. उच्च न्यायालयाने संस्थेच्या बाजूने निकाल दिला असणे, तशाप्रकारचे आदेश दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी पारित केले असणे, मात्र महसूल विभागने संबंधित सोसायटीला संपादित केलेली जागा अद्याप परत केली नसणे, महसूल विभागने न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मात्र महसूल विभाग व शासनाने याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व महसूल विभाग व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१०) | ५३९१ | १० | अंबोजवाडी, मालवणी, कलेक्टर लॅन्ड, मालाड (प.) मुंबई या विभागात मोठया प्रमाणावर मुस्लीम सजाज रहात असून त्यांना अंत्यविधीसाठी सर्वे न.२६३, मौजे मालवणी गाव येथील (५ एकर) व (१ एकर) शिया मुस्लीम स्मशानभूमीची आरक्षण असणे, स्मशान भूमीसाठी जमीनची आवश्यकता असणे, तसेच स्मशान भूमीच्या कामाकरीता निधीची तरतूद केली नसणे, स्मशान भूमीचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे महसूल विभाग व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत महसूल विभाग व शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५३९३ | १० | मुंबई उपनगर जिल्हयातील विविध प्रकरणी नगर भुमापन अधिकारी, गोरेगांव अधिनस्त मौ. एसोळ, ता. बोरीवली, जिल्हा उपनगर तसेच उपअि ाक्षक भुमी अभिलेख मुंबई उपनगर कार्यालय अंतर्गत हद्द कायम मोजणीचे नकाशे बनावटरित्या तयार करण्यात येत असणे, मोठया प्रमाणावर बनावट नकाशे बनविले असणे, अद्याप कोणावरही कार्यवाही झाली नसणे, या प्रकरणी शासनाने जमावबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख , पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४.१.२०२२ रोजी समिती गठीत केली असणे, समितीने आपला अहवाल शासनास सादर केला नसणे, सखोल चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करुन चौकशी करणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१२) | ५३९५ | १० | मुंबई उपनगरातील मौ.बोरीवली ता.बोरीवली येथील सर्व्हे नं. २०९ योगी नगर (विचार कंपाऊण्ड ) या मिळकतीवर सरकार असे नांव तहसिलदार बोरीवली यांच्या कार्यालयात नमुद असणे, सदर जमिनीवर नोंद असलेलया तिवरांची झाडे असणे, मात्र तिवरांच्या झाडांची मोठया प्रमाणावर कत्तल केली असणे, त्या भुखंडावर अनिवासी अनेक गोडाऊन्स बांधले असणे, ५० ते ६० अनधिकृत बांधकामे झाली असणे, व्हिजन स्टुडिओ व गाडयांचे शोरुम निर्माण झाले असणे सदरची अनधिकृत बांधकामे तातडीने तोडण्याची आवश्यकता असणे, मात्र संबंधित अधिकारी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| (१३) | ५३९७ | १० | राज्यात रेती घाटाचे लिलाव करुन रेती उपसा करण्याची परवानगी देण्यात येत असणे तथापि सध्याच्या रेती लिलाव प्रक्रियेमध्ये त्रुटी असणे मोठया प्रमाणावर रेती उपसा होत असल्याने पर्यावरणाचा धोका निर्माण झाला असणे, अवैध वाळू उपसा धंद्याला संबंधित अधिकारी व पोलीस अधिकारी यांचा समन्वय निर्माण झाला असणे, परिणामी राज्याच्या महसुलावर परिणाम झाला असणे त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असणे, रेती उपसा करण्यास प्रतिबंध करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने तेलगंणा राज्याच्या धर्तीवर रेती धोरण राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष स्थानिक रहिवाश्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१४) | ५४०० | १० | कालेश्वर प्रकल्प मेडीगट्टा बॅरेज हा प्रकल्प महाराष्ट्र व तेलंगणा या दोन्ही राज्याचा संयुक्त प्रकल्प असणे, आंतरराज्य मंडळ बैठकीमध्ये झालेल्या सांमजस्य करारानुसार प्रकल्प होत असणे, प्रकल्पाकरिता राज्यातील गडचिरोली जिल्हयातील जमीन संपादन करण्याची आवश्यकता असणे मो.पोचमपल्ली, आयपेठा व वडधम येथील जमीन खरेदीचा प्रस्ताव सादर केला असणे, अद्याप जमीन संपादन झाले नसणे, जमीन धारकांना जमीनीचा मोबदला जास्तीच्या भावाने देण्याची गरज असणे, त्याचप्रमाणे जमीनीचा जादा दराने मोबदला देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१५) | ५४०२ | १० | मौजे गजवडी ता.जि.सातारा येथे 50 वर्षापूर्वीची जुनी स्मशानभूमी असणे, त्याच ठिकाणी नवीन स्मशसन भूमी प्रस्तावित असणे, सदरच्या स्मशान भूमीस माहे डिसे.2022 च्या दुस-या आठवडयात प्रशासकीय मान्यता मिळाली असणे, मात्र अद्याप कामास सुरुवात झाली नसणेख सरपंच,गजवडी ग्रामपंचायत यांनी शासनाकडे वारंवार मागणी केली असणे, तयाच प्रमाणे स्थानिक नागरिकांनी ही मागणी केली असणे, मात्र संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, स्मशान भूमी बांधणे अत्यंत आवश्यकता निर्माण झाली असणे, स्मशान भूमी अभावी गावक-यांची गैरसोय निर्माण होत असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नगारिकांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (१६) | ५४१५ | १०० | नगरभूमापन अधिकारी ठाणे येथील पाचपाखाडी सर्व्हे नं. २२९/१७ टि.पी. नं. १ नगरभूमापन क्र. ३८७ च्या जमिन मिळकतीत सातबाऱ्यावरील नोंदीप्रमाणे व टि.पी. स्कीम मधील सुधारणेप्रमाणे मुळ खातेदार मधुकर गणपत कोडालकर यांचे नाव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पत्रकेवर न आल्याने व गणपत आनंदा कोंडाळकर आजोबा हे मयत असल्याने वारस चित्रा हरिचंद्र जाधव यांचे नांव मिळकतपत्रीकेवरती नोंदवणेसाठी व मधुकर गणपत कोंडाळकर यांचे नाव टि.पी. स्किमप्रमाणे राहून गेल्याने जुने सातबारा पाहता टि. पी. स्किमप्रमाणे मधुकर गणपत कोंडाळकर यांचे नांव मिळकत पत्रिकेवरती नोंदविण्याचे राहुन गेले त्याची दुरुस्ती म्हणुन महाराष्ट्र शासन प्रधानसचिव नगरविकास विभाग यांच्याकडे दि. ४/२/२०२१ रोजी चित्रा हरिश्चंद्र जाधव यांनी निवेदन सादर केले होते परंतु सदर निवेदनाबाबत कुठलीही कार्यवाही न झाल्याने शासनाने मधुकर गणपत कोंडाळकर यांचे हक्क अधिकार त्यांची मुलगी चित्रा हरिश्चंद्र जाधव यांना मिळण्यासाठी शासनाने तुर्त करावयाची कार्यवाही. |
| (१७) | ५४१९ | १०० | मौजे-टेमघर ता. भिवंडी जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १२५ व ईतर ४ सर्व्हे नंबरमधील फेरफार क्र. ३९७ अस्तित्वात असुन मोहम्मद कासीम याकुब चिमन यांनी जमिन कोणालाही विकलेली नसतांना सन २०११ पर्यंत सातबारा सदरी मोहम्मद कासीम यांचे नाव असतांना त्यांचे नाव गैरव्यवहारातून तलाठी पानी कुठलाही फेरफार न नौदविता सातबारावरील मोहम्मद कासीम यांचे नाव सातबाऱ्यावरुन कमी केले याबाबत तहसिलदार भिवडी यांच्याकडे महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार दि. १/२/२०१२ रोजी जिल्हाधिकारी यांना तक्रार दाखल केले असतांना तहसिलदार यांनी सक्षम न्यायालयात दाद मागावे असे सुचना केल्या सक्षम न्यायालयात दाद मागण्यासाठी कुठल्या फेरफाराला आव्हानित करायचे याबाबत तहसिलदार यांनी कोठेही सांगितले नाही सातबारा हा २०१० पर्यंत मोहम्मद कासीम यांच्या नावे होता त्यानंतर विनाफेरफार विना हुकूम उपविभागीय अधिकारी यांच्या कुठल्याही आदेशान्वये मोहम्मद कासीम यांचे नाव कमी करून सातबाऱ्यावरून काढण्यात आला त्यामुळे सध्या ज्यांचे नावे चुकीच्या फेरफाराने सातबारा नोंद झालेली आहे त्यांना महसुल विभागाच्या अधिकायांनी गैरव्यवहारातुन जमिन हडप करण्यासाठी मदत केलेली आहे याचप्रमाणे भोकरी पडघा भिवंडी येथील सर्व्हे क्र. ७३३. व ईतर याचे शेतजमिन न्यायाधिकरण कडुन हुकूमाने आदेश होऊन फेरफार क्र. ४२३ संरक्षित कुळ म्हणुन दाखल असताना सातबारा सदरी तलाक्यानी अमल न दिल्याने सदर जमिन प्रकरणात खुप मोठी गुंतागुंत निर्माण झाल्याने त्याच्या दुरुस्तीकरणेकामी मुक्तार शेख यांनी अनेक तक्रारी केलेल्या असून अद्याप तेथील तलाठी व मंडळ अधिकारी कुठलीही कार्यवाही करत नसल्यामुळे शासनाने सदर प्रकरणाचे गंभीररीत्या दखल घेऊन बिना फेरफार कमी झालेले मोहम्मद कासीम यांचे नाव तात्काळ पुन्हा अंमल होण्यासाठी व मुक्तार शेख यांचे नांव सातबाऱ्यावर अंमल देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया व भूमिका. |
| (१८) | ५४२० | १०० | मौजे- कोलिवली गाव, ता. भिवंडी, जि.ठाणे येथील क्रमांक १०६ व ईतर दि. २४/७/२०१२ रोजी दिवाणी न्यायकार भिवंडी यांनी आमच्या नावे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून वास प्रमाणपत्र (Succession Certificate) प्रमाणे वारस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दाखला दिलेला असुन खरी वस्तुस्थिती सर्व जमिन कानू रामा गुरव (मयत)- भागीबाई मगळया म्हात्रे ( मुलगी मयत) व सर्व खालील वंशावळ मध्ये दिलेले वारस असल्यामुळे या सर्वांची नावे जमिनीमध्ये २०१२ सालीच तात्कालीन तलाठी यांनी साताऱ्यावर पाहिजे होते, परंतु तहसिल कार्यालयातील विवादग्रस्त प्रकरण फेरफार क्र. १००५मध्ये आपल्या तलाठी विभागाकडून सर्व्हे क्र. १०६/५ एवढाच सातबाऱ्यावरती नावे नोंदवण्यात आले दिवाणी न्यायालयांच्या आदेशाचे पालन झालेले नसल्याने दिवाणी न्यायालय भिवंडी क- स्तर यांचा २०१५ चे तात्कालीन तलाठी यांनी अवमान केल्याचे दिसते आणि त्यांनी न्यायालयाबरोबर व शेतकऱ्यानं बरोबर बनवा बनवी करून दुसरे वारस कुटूंबदारांना गैरलाभ पोहोचवा म्हणुन गैरकायदेशीर खटाटोप झालेला आहे. दिवाल यांचे आदेशाचे कुठेही अवमान होऊ नये म्हणून याची दक्षता तलाठी अधिकारी म्हणुन घेणे आवश्यक होते अन्यथा दि. २/३/२०२३ दि. ८/३/२०२३ च्या तहसिलदार येथे नागरीकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व दिवाणी न्यायालय क स्तर भिवंडी यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र दाखल्यानुसार नावे दाखल न केल्याने शासनाने वारंवार होत असलेले न्यायालयीन अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध कठोर ती कठोर उपाययोजना करून न्यायालयांची अंमलबजावणी तात्काळ होणे कामी शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका. |
| (१९) | ५४२२ | १०० | भिवंडी तहसिल कार्यालयातील मौजे निजामपुरा गांव सर्व्हे क्र. ७४३ /व ईतर मिळकतीत कुळकायदा कलम ७० ब चे आदेश १९५० साली तात्कालीन तहसीलदार यांच्यामार्फत मंजुर झालेले असतांना तब्बल २५ वर्षानंतर विलंबाचा कायदा मोडून तहसिलदारानेच तहसिलदाराचे आदेश ७० व रद्द केल्याने त्याचे पुनर्विलोकन होणेबाबत दि. ४/२/२०२१ रोजी विभागीय कोकण आयुक्त, मुंबई यांच्याकडे श्री. मारुती बारकु बाळ यांनी तक्रार दिली होती सन १९५० पासुन असलेल्या कुळखातेदाराला कुठलीही नोटीस न बजावता १९७६ सालच्या विद्यमान तहसिलदारांनी विलंबाचा कायदा मोडून परस्पर तत्कालीन तहसिलदाराचे आदेश विद्यमान तहसिलदाराने रद्द करून स्वतः चा कायदा वापरून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान केलेले असल्यामुळे निजामपुर गावातील सदर जमिन मिळकतीत झालेली अनियमीतता व अगुणवत्तेच्या आधारावर झालेले सर्व फेरफारांचे पुनर्विलोकन होण्यासाठी उपविभागीय अधिकारी भिवंडी व विभागीय कोकण आयुक्त यांनी गंभीररीत्या दखल घेऊन जेष्ठ शेतकऱ्याला न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका. |
| (२०) | ५४२३ | १०० | उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे मौजे गुंदवली गाव येथील सर्वे क्र. २३/२५ व ईतर सर्व्हे क्र. जागेत दिवाणी न्यायालयाची स्थगिती असतांना फेरफार क्रं. १३३७, १३३८ व १३८८ हे गैरकायदेशीर मंजुर करण्यात आले त्याबाबत हक्कवारसनोंदीचे अनेक दिवसांपासून वाद निर्माण झालेले असतांनाही तात्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी तीन फेरफार मंजुर केलेला सदर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रकरणात अनियमितता घडून आल्याने कनकीबाई हेदर म्हात्रे यांनी तलाठी सजा पुर्णा व उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे सदर फेरफाराच्या पुनर्विलोकनासाठी दि. १०/३/२०२३ रोजी तक्रार दाखल केलेली असुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ पुनर्विलोकन घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२१) | ५४२४ | १०० | मौजे मोहिली गांव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील जुना सर्व्हे क्र. २९/३ वनदिन सर्व्हे क्र. २१/३ क्षेत्र ०-३४०० सातबाऱ्याप्रमाणे व आकारबंदप्रमाणे ० ३७-१९० असे असुन जागा कब्जेवहिवाटीमध्ये शिल्लक असल्याने तात्कालीन तलाठी यांच्या हस्तदोषामुळे अथवा गैरसमजुतीमुळे विधवा महिला मनिषा म्हात्रेच्या सातबाऱ्यावरती आकारबंदप्रमाणे शिल्लक राहिलेले क्षेत्र ०-०३-०९ हे क्षेत्र शिल्लक असुन त्याचे सातबारेवरती दुरुस्ती होणे फार गरजेचे आहे, कारण सदर क्षेत्र हे तालुका भूमिअभिलेख यांचेकडील आकारबंद क्षेत्र ०-३७-२० असे असल्याने सातबारेवरती तलाठ्यांच्या हस्तदोषांमुळे व गैरसमजुतीमुळे सातबारा क्षेत्र ०-३४०० असे झाले असल्यामुळे आकारचंदप्रमाणे संपुर्ण क्षेत्र ०-३७-९० सातबाऱ्यावरती क्षेत्र दुरुस्ती करुन नमुद करण्यात आले पाहिजे होते, या मिळकतीमध्ये मुंबई-वडोदरा राष्ट्रीय राजमार्गसाठी जमिन भूसंपादित होऊन मोबदला मिळाला आहे, तर उरलेले हिस्स्यास उर्वरीत जमिन आली आहे पण आकारबंदप्रमाणे मुळ क्षेत्र राहुन गेल्याने उर्वरीत आकारबंद प्रमाणे ०-०३-१० राहुन गेलेले क्षेत्र दुरुस्त करणे आवश्यक आहे उर्वरीत एकूण क्षेत्र ०-१२५२ असे असून आकारबंद प्रमाणे क्षेत्राची दुरुस्ती कलम १५५ खाली करण्यासाठी दि. २०/२/२०२३ रोजी तहसिलदार कार्यालय भिवंडी यांच्याकडे विधवा महिला मनिषा भालचंद्र म्हात्रे यांनी निवेदन सादर केलेले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२२) | ५४२५ | १०० | अधिक्षक भूमिअभिलेख पालघर यांच्याकडील वाडा नगरपंचायत येथील नगरभूमापन क्रं. १७२२ व इतर मधिल वडिलोपार्जित मिळकतीमध्ये नंदकुमार रोडगे यांनी दोन जिवंत बहिणींना मयत दाखवुन त्यांचे वारस डावलून परस्पर खोटे कागदपत्र दाखल करून स्वतःचे नांव मिळकतपत्रीकावरती नोंदविल्याने समिर लक्ष्मण आळशी व ईतर यांनी अधिक्षक भूमिअभिलेख पालघर यांच्याकडे अपिल दाखल केले असुन भिवंडी दिवाणी न्यायालयातील अपिलामध्ये स्पेशल सिविल सुट १८५/२००८ ठाणे मध्ये डिक्री आदेश इतर दुसऱ्या सर्व्हे नंबरसाठी मंजुर झालेले असतांना या प्रकरणांमध्ये अधिक्षक भुमिअभिलेख यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न प्रतिवादिनी केलेला असल्याने अधिक्षक मुमिअभिलेख पालघर यांनी अशा प्रकरणांमध्ये खरेखुरे वारसाचे चौकशी करून त्यांची नोंद घेणेची आवश्यकता. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- २,६६,१९,२५,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२३) | ५४४५ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर तालुकयातील खिरोदा प्र यावल निंबोल, ऐनपुर , गाते, मस्कावद बु ,रायपूर ,मोरगाव खु ,अटवाडे ,खानापूर, बलवाडी, शिंगाडी, सावखेडा बुउदळी बु ,अजंदे, विवरे बु ,के-हाळे, बुवाघोड, खिर्डी बु ,तांदलवाडी, कांडवेल ,निंभोरा बु,धामोडी,खिरवडयेथील तलाठी कार्यालयाची अत्यंत दुरावस्था असून तलाठी कार्यालयाची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही. |
| (२४) | ५४४८ | १० | जळगांव जिल्हयातील यावल तालुकयातील तलाठी कार्यालय बांधकाम १)तलाठी मनवेल. २)तलाठी साकळी. ३)तलाठी पाडळसे. ४)तलाठी अट्रावल. ५) तलाठी डोंगर कठोरा. ६) पाडलसे ७) अट्रावल, ८) डोंगरकठोरातलाठी कार्यालयाची अत्यंत दुरावस्था असून तलाठी कार्यालयाची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२५) | ५४४७ | १० | शासनाने गावपातळीवर महसुल प्रशासनासोबत नागरीकांमध्ये राहुन शासकीय दप्तराची ने-आण शासनाच्या विविध योजना, अतिवृष्टी, दुष्काळ, खरेदी-विक्रीच्या नोंदी अशा सुचना / आदेश दवंडीद्वारे नागरीकांपर्यंत पोहचविणे, चावडी व गावकामगार तलाठी कार्यालयाचे स्वच्छता, जन्म-मृत्यू, विवाह, कर वसुली इ. बाबतची माहिती देणे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोपविलेली शासकीय कामे पत्रव्यवहार इत्यादी कामे पारपाडण्यासाठी स्थानिक व गरजू नागरीकांना सहकार्य करणारा महत्वाचा दुवा असलेले कोतवाल हे पद माझ्या मतदारसंघातील खालील गावात वेगवेगळया कारणास्तव रिक्त असल्याने अनेक किरकोळ अडचणीची माहिती न मिळाल्याने प्रशासनासह नागरीकांना नाहक मनस्थाप सहन करावा लागत आहे. - जेजुरी, पिसर्वे, दिवे, राजुरी या गावातील “कोतवाल” पदे भरणेकामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| (२६) | ५४४९ | १० | ता. पुरंदर, जि. पुणे येथील “पोलिस पाटील” पदे भरणेबाबत..शासनाने गावपातळीवर महसुल व पोलिस प्रशासनासोबत नागरीकांमध्ये राहुन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र कार्यरत राहून नागरीकांना व शासनास सहकार्य करणारा महत्वाचा दुवा असलेले पोलिस पाटील हे पद आहे. माझ्या मतदारसंघातील खालील गावात वेगवेगळया कारणास्तव पोलिस पाटील हे पद रिक्त असल्याने अनेक किरकोळ अडचणीचे वेळीच गावपातळीवर निराकरण न झाल्याने गंभीर घटना घडल्याने नाहक मन:स्थाप सहन करावा लागत आहे.सोमुर्डी, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सोनोरी, आंबोडी, बांदलवाडी, चिव्हेवाडी, मिसाळवाडी, काळेवाडी, पठारवाडी, थोपटेवाडी, तोंडलकाळदरी, सुपे खुर्द व कोळविहिरेमांडकी व वाल्हे तक्रारवाडी गावातील "पोलिस पाटील" पदे भरणेकामी सहकार्य करावे. |
| (२७) | ५६९७ | १० | हस्तलिखित ७/१२ संगणकीकृत करताना त्यामध्ये झालेल्या चुका दुरूस्त करण्यासाठी करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये होणारी दुरूस्ती खातेदारांनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर तात्काळ व्हावी मागील २ वर्षापासून अशी अनेक प्रकरणे तहसिलदार, मंडल अधिकारी, तलाठी यांच्याकडे प्रलंबित असल्याने खातेदार मेटाकुटीला आलेला असून त्यामुळे वाटपपत्रे, वारस नोंदी, खरेदी व्यवहार रखडलेले आहे. त्याचा ७/१२ वरील इतर खातेदार लाभ घेत असल्याचे गैरप्रकार निर्दशनास आलेले आहे याबाबत योग्य तो निर्णय व्हावा.यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२८) | ५३६४ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तहसिल कार्यालयाअंतर्गत असलेल्या तलाठी कार्यालयांकरीता शासकीय ईमारती उपलब्ध नसणे, तालुक्यातील तलाठी कार्यालय भाड्याच्या घरामध्ये असणे, प्रशस्त ईमारती उपलब्ध नसल्यामुळे शासकीय रेकार्ड उपलब्ध नसणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहण करावा लागत असणे,त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (२९) | ५३६७ | १० | भंडारा जिल्ह्यातील लाखनी तहसिल कार्यालयाअंतर्गत असलेल्या तलाठी कार्यालयांकरीता शासकीय ईमारती उपलब्ध नसणे, तालुक्यातील तलाठी कार्यालय भाड्याच्या घरामध्ये असणे, प्रशस्त ईमारती उपलब्ध नसल्यामुळे शासकीय रेकार्ड उपलब्ध नसणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहण करावा लागत आहे.त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (३०) | ५३७० | १० | भंडारा जिल्ह्यातील साकोली तहसिल कार्यालयाअंतर्गत असलेल्या तलाठी कार्यालयांकरीता शासकीय ईमारती उपलब्ध नसणे, तालुक्यातील तलाठी कार्यालय भाड्याच्या घरामध्ये असणे, प्रशस्त ईमारती उपलब्ध नसल्यामुळे शासकीय रेकार्ड उपलब्ध नसणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांना त्रास सहण करावा लागत असणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३१) | ५४७२ | १० | महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३ नुसार राज्यात्त सक्षम प्राधिकारी हे राज्यात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र निर्गमित करणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्रातील सर्वसाधारण रहिवाश्यांकरिता नियम ४(६)आणि नियम ५(२) (a) and (b) नुसार विहित केलेला नमुना FORM "C" मध्येच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करणे बंधनकारक असणे, तसेच सदर प्रमाणपत्रामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीनुसारच अनुसूचित जमातीचे नाव आणि क्रमांक यांचाही उल्लेख करणे अनिवार्य असणे, मात्र मागील काही वर्षात अनेक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीना जमातीचे नाव चुकीच्या पद्धतीने लिहून प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेले असणे, त्यामुळे विद्यार्थाचे महाविद्यालयीन प्रवेशास अडचणी निर्माण होऊन प्रवेश रद्द झाल्याचीही उदाहरणे घडणे, याबाबत महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: एसटीसी-२०१६/प्र.क्र.१५८/का.१० तारीख: २२ जून, २०१६ नुसार सर्व सक्षम प्राधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या असणे, असे असतांनीही राज्यात्त सक्षम प्राधिकारी हे असे प्रमाणपत्र बदलून देण्यास टाळाटाळ करणे, सबब यामुळे आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (३२) | ५३४७ | १०० | जळगाव जिल्ह्यातील चोपडा येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे पण हायस्कूलच्या मागच्या बाजूला महसूल विभागासाठी 3 कोटी रुपये खर्चून प्रशासकीय इमारत उभारण्यात आली असणे इमारतीचे काम संपले तरीही ही इमारत विना वापर पडून असणे, इमारतीचा वापर नसल्यामुळे इमारतीचे प्रचंड नुकसान होणे, इमारतीचे काम पूर्ण करून सार्वजनिक बांधकाम विभागाने 2019 मध्ये महसूल विभागाकडे हस्तांतरण केलेले असणे, त्यामुळे सदरील इमारतीचा वापर तात्काळ सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (३३) | ५३४१ | १० | नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात लासलगाव येथे अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २१ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री महसूल तसेच दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे मागणी केलेली असणे, निफाड तालुक्याची वाढणारी लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ इ. बाबींमुळे सद्याच्या निफाड तालुक्यातील तहसिल कार्यालयावर कामकाजाचा प्रचंड ताण पडत असणे, निफाड तालुक्यात ११ महसुली मंडळे, ६३ सज्जे तर १३८ महसुली गांवे असणे, त्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने निफाड तालुक्यातील लासलगाव येथे स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्याची आवश्यकता असणे, प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील लासलगाव येथे स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०३०, मुद्रांक व नोंदणी**<br>**रूपये:- ३,२४,३९,३७,०००/-**<br>**श्री. विकास ठाकरे** |
| (३४) | ५७२७ | १० | मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे येथील कोलशेत व तालुका भिवंडी येथील मौजे कोळी गाव काणेरी गावा दापोडेगाव गावातील झालेल्या साडेकरारांच्या मुद्रांक शुल्क अभिनिर्णय व कमी भरलेले मुद्रांक शुल्क दरव इतर लोकांनी न भरल्याने त्यांच्याकडून थकित महसुलांचे रक्कमेची वसूली करणे जरूरीचे आहे हे वसूल न झाल्याने शासनाचे गतकाळात १६००० रुपये कोटींचे नुकसान झालेले आहे. मुद्रांक जिल्हाधिकारी यानी सदर प्रकरणात स्वारस्य न दाखवल्याने असे अनेक प्रकरणे गेल्या ७-८ वर्षांपासून प्रलंबित अवस्थेत आहे. मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे जुने खरेदीखत, साठेकरार, करारनामे, कुलमुखत्यारपत्र, हक्कसोडपत्र, वाटणीपत्र, कराराचे परतावा आदिचे विलीन झाल्याने शासनाचे होणारे नुकसान मुद्रांक शुल्क मुल होण्यासाठी तात्काळ धकित राहिलेले मुद्रांक भरण्याची संबंधितांना नोटीस बजावून कमी पडलेले मुद्रांक शुल्क वसुल करणे वसूल न झाल्यास संबंधितांच्या मिळकतपत्रकावरती कमी पडलेले मुद्रांक शुल्क वसुत न झाल्यास संबंधितांच्या मिळकतपत्रीकावरती कमी पडलेले मुद्रांक शुल्काचे बोजा चढविणेबाबत मुंबई मुद्रांक अधिनियम। १९५८ चे परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक ४६ १३ अन्वये अपुरे मुद्रांक शुल्क नुसार शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (३५) | ५४१६ | १०० | मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे येथील कोलशेत व तालुका भिवडी येथील मौजे कशेळी गाव, कणेरी गाव, दापोडे गाव गावातील झालेल्या साठेकरारांच्या मुद्रांक शुल्क अभिनिर्णय व कमी भरलेले मुद्रांक शुल्क अर्जदार व इतर लोकांनी न भरल्याने त्यांच्याकडून थकित महसुलांचे रक्कमेची वसूली करणे जरूरीचे आहे ते वसूल न झाल्याने शासनाचे गतकाळात १६००० रुपये कोटींचे नुकसान झालेले आहे. मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर प्रकरणात स्वारस्य न दाखवल्याने असे अनेक प्रकरणे गेल्या ७-८ वर्षापासून प्रलंबीत अवस्थेत आहे. मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे जुने खरेदीखत, साठेकरार, करारनामे, कुलमुखत्यारपत्र, हक्कसोडपत्र, वाटणीपत्र रद्दकराराचे परतावा आदिचे थकितवसूली न झाल्याने शासनाचे सततचे होणारे नुकसान मुद्रांक शुल्क वसूल होण्यासाठी तात्काळ थकित राहिलेले मुद्रांक भरण्याची संबंधितांना नोटीस बजावून कमी पडलेले मुद्रांक शुल्क वसुल करणे वसूल न झाल्यास संबंधितांच्या मिळकतपत्रकावरती कमी पडलेले मुद्रांक शुल्कांचे बोजा चढविणेबाबत मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे परिशिष्ट (मधील अनुक्रमांक ४८/१३ अन्वये अपुरे मुद्रांक शुल्क नुसार शासनाने करावयाची कारवाई. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बाधकामे**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (३६) | ५६४८ | १० | जळगांव जिल्हयातील रावेर व यावल तालुक्याचे प्रांताधिकारी यांचे निवासस्थाची अत्यंत दुरावस्था झाली असुन या निवासस्थानाची नव्याने बांधकाम होणे गरजेचे असून याबाबत करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना. |
| (३७) | ५६५० | १० | जळगांव जिल्हयातील रावेर तालुक्यातील महसूल विभागाचे तहसीलदार व कर्मचारी यांचे निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था असून ही निवासस्थाने राहण्यास योग्य नसल्यामुळे रावेर तालुक्यातील महसुल कर्मचा-यांसाठी नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ५६५४ | १० | जळगांव जिल्हयातील यावल तालुक्यातील महसूल विभागाचे तहसीलदार व कर्मचारी यांचे निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था असून ही निवासस्थाने राहण्यास योग्य नसल्यामुळे यावल तालुक्यातील महसुल कर्मचा-यांसाठी नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता असून याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (३९) | ५४४१ | १० | हवेली तालुक्याची ( जि.पुणे ) लोकसंख्या सुमारे 8 लाख असून दिवसेंदिवस या लोकसंख्येत मोठी भर पडणे, एवढया मोठया लोकसंख्येच्या हवेली तालुक्याचे कामकाज एकाच तहसिलदारा मार्फत चालविले जाणे, महसूल खात्याशी सबंधित अनेक नागरिकांची कामे वेळेवर मार्गी लागत नसून अनेक कामे प्रलंबित असणे, सर्वसामान्य जनतेला दैनंदिन कामासाठी तहसिल कार्यालयात हेलपाटे मारावे लागणे, हवेली तालुक्यातील पूर्व भागातील महसूल मंडळामधील वाघोली, उरुळी कांचन, थेऊर आणि कळस या चार मंडळामधील लोकसंख्या सुमारे 6 लाख असणे, नागरिकरण वाढत असल्याने कामांमध्ये दिरंगाई होणे परिणामी दिवसेंदिवस तक्रारींमध्ये वाढ होणे, पूर्व हवेली तालुक्यातील नागरिकांना हवेली तहसिल कार्यालय शुक्रवार पेठ पुणे येथे येण्यासाठी वाहतुक कोंडीला सामोरे जावे लागणे, हवेली अप्पर तहसिल कार्यालयास शासनाकडून तत्वत: मंजूरी मिळालेली असूनही अद्यापपर्यंत अप्पर तहसिल कार्यालय सुरु झालेले नसणे, अप्पर तहसिल कार्यालय मौजे कदमवाकवस्ती ता. हवेली येथील गट क्रमांक 177 मधील क्षेत्र पो.ख. 4.39 आर क्षेत्रामध्ये होणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, हवेली पूर्व भागातील नागरिकांच्या सोईसाठी तत्वत: मंजूर झालेले स्वतंत्र अधिकारी, कर्मचारी वर्ग यांची नेमणुक करुन नवीन अप्पर तहसिल कार्यालय सुरु होणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (४०) | ५३३९ | १० | नाशिक जिल्ह्यातील येवला मतदारसंघातील निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये-निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दि. १९ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये व ४६ गावांमध्ये तलाठी कार्यालये-निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९.१२.२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव पाठविलेला असणे, सदर प्रस्तावातील निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये -निवासस्थान (रक्कम रु. ११० लक्ष) इमारत बांधकामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नसणे, दि.९.१२.२०२१ च्या प्रस्तावातील उर्वरित निफाड तालुक्यातील ३ गावांमधील मंडळ कार्यालये निवासस्थाने इमारत बांधकाम अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- १,९६,०००/-**<br>**श्री. विकास ठाकरे** |
| (४१) | ५३२५ | १० | नागपूर येथील प्रसिध्द गोरेवाडा जंगल हे ब्रिटीश कालीन जंगलापैकी एक असून येथे हजारो जेष्ठ नागरीक दैनंदिन मॉर्निंग वॉक करायला तसेच भ्रमणाकरीता येत असतात, या जंगलामध्ये सकाळी भ्रमण करतेवेळी त्यांना मूलभूत सोई सुविधांच्या अभावी अडचणींचा सामना करावा लागतो. त्याकरीता त्यांना या परिसरात वॉकींग ट्रॅक रस्त्यांच्या मधील येत असलेल्या नाल्यांवरील पुल, रस्त्याचे नुतनीकरण तसेच ग्रीन जीम व थोडा वेळ निवारा घेण्याकरीता निवारागृह अथवा विश्राम करण्याकरीता शेडची व्यवस्था तसेच महिला वॉकर्स यांना कपडे बदलविण्याची एक रूम व स्वच्छतागृह अशाप्रकारच्या अत्यावश्यक मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ५६,११,९८,०००/-**<br>**श्री. दिलीपराव बनकर** |
| (४२) | ५६८४ | १०० | निफाड (जि.नाशिक) तालुक्यात १२४ पोलीस पाटील पदे मंजूर असून आजमितीस सुमारे २४ पदे रिक्त आहे सदरची रिक्त पदे भरनेची असलेली मागणी माहे मार्च, २०२२ रोजी शासनाकडे मागणी केलेली असणे, परंतु या मागणीकडे होत असलेले दुर्लक्ष सदरची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय**<br>**रूपये:- ४०,२२,५२,४०,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४३) | ५४३५ | १० | तारखेड ता. तिवसा जि.अमरावती येथील पिंगळाई नदी पात्रात वाहून त्यांचा मृत्यू झालेल्या त्यांच्या कुटूंबाला 25 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक 21/9/2022 रोजी लेखी निवेदन दिले असणे, परंतु अद्यापही मृत व्यक्तींची कुटूंबीयाना आर्थिक मदत देण्यात आली नसणे, करीता मृत व्यक्तींची कुटूंबीयाना आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| (४४) | ५४३६ | १० | अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यामधील ठाणाठुणी, पालवाडी, मार्डी, नविन भारवाडी, वरखेड, हेडणी शेंदुरजना बाजार, भांबोरा, इत्यादी गावामधील अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या लिंबुवर्गीय फळपीक व इतर फळ पिकांची माहिति निरंक दाखवली असल्यामुळे शेतकरी नुकसान भरपाई पासुन वंचित राहले असल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत मा. जिल्हा कृषी अधिक्षाक, कृषी विभाग, अमरावती यांना दि. 16 सप्टेंबर 2022 वा त्या दरम्यान निवदेन दिले असणे, बाधीत झालेल्या लिंबुवर्गीय फळपीक व इतर फळ उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली नसणे, तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या फळपिकांची नुकसान भरपाई मिळणेबाबत करावयाची कार्यवाही |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (४५) | ५३९४ | १०० | जिल्ह्यात अतिवृष्टी काळात किंवा अन्य कारणांनी पूर परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा तत्सम आपत्ती काळात एस डी आर एफ व एन डी आर एफ पथकांना जलाशय किंवा वाहत्या पाण्यात उतरून मदत करण्यासाठी स्पीड बोट, लाईफ जॅकेट, जीवन रक्षक किट, ऑक्सिजन किट यांसारखे कोणतेही साहित्य उपलब्ध नसणे, सदर साहित्य उपलब्ध नसल्याने व पर्यायाने आपत्ती काळात वेळेवर मदत न पोचल्याने 20 सामान्य नागरिकांचे तसेच एन डी आर एफच्या बचाव पथकातील एका जवानाचे प्राण गत एक वर्षात गेले असणे, यासाठी आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी कामी येणारे स्पीड बोट, लाईफ जॅकेट, ऑक्सिजन किट, जीवन रक्षक किट असे सर्व साहित्य बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षास उपलब्ध करून देण्याची होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- ३१,२१,३६,९२,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (४६) | ५६८१ | १० | माझ्या कार्यक्षेत्रातील ता. पुरंदर, जि. पुणे येथील किल्ले पुरंदर, पिंगोरी, वाल्हा, सासवड, काळदरी, दवणेवाडी, मांढर, पांगारे, धनकवडी, चिकणेवाडी, दिवे घाट या परीसरात मागील महिन्यापासून सातत्याने बिबट्या, वाघ, रानडुक्करे असल्याचे निर्देशानास आलेले आहे. सध्या बिबट्या, वाघ मनुष्यवस्तीत राजरोसपणे फिरत असल्याने कोणतीही दुर्घटना / जीवित हानी होण्याअगोदर कारवाई केल्यास शेतीकऱ्यांना शेतीची कामे करताना व जनावरांना डोंगरावर चरावयास नेताना भितीचे वातावरण निर्माण होणार नाही. तरी वारंवार प्रसारीत होणाऱ्या बातम्या व प्रत्यक्षदर्शी नागरीकांनी केलेल्या तक्रारींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून पुरंदर किल्ला ते पिंगोरी परीसरात वावरनाऱ्या बिबट्या, रानडुक्करे यांच्या उपद्रवामुळे ग्रामस्थ भयभीत झालेले असून खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरात योग्य त्या उपाययोजना करून लवकरात लवकर बिबट्यास जेरबंद करणेबाबत निर्णय व्हावा. यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (४७) | ५४७५ | १० | ”पालघर जिल्ह्यातील वन विभागातील अधिकाऱ्यांनी जव्हार, मोखाडा व वाडा तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागाने जलसंधारण अंतर्गत दगडी बांधकाम आणि चर खोदण्याची कामे न करता 78 कोटी 16 लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, यासंदर्भात विभागाने कर्मचाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केलेला असणे, यामध्ये ठाण्याचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, वन अधिकारी आणि लागवड अधिकारी यांच्यासह एकूण दहा जणांवर गुन्हा दाखल केलेला असणे, परंतु वन विभागाकडे प्रकरण सादर न करता आदिवासी विकास विभागाकडे सादर करून अधिकाऱ्यांना वाचविण्याचे काम करण्यात येत असल्यामुळे पोलिसांना यामध्ये चौकशी आणि तपास करण्यात आलेले अपयश, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण, याबाबतीत संबंधित स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्यामुळे आदिवासी आयुक्त कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह बँकेच्या कर्मचाऱ्यांची देखील चौकशी होण्याची आवश्यकता, मजुरांचे पगार रोखीने देणे, परवानगी न घेता वाटेल ती कामे करणे, परवानगी न घेता निधी परस्पर वळविणे, तो खर्च करणे, बीडीएस प्रणालीचा वापर न करता डीडी ने पैसे देणे, यामध्ये विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुकसंमती असणे, सदर प्रकरणी कारवाई करण्यास शासनाकडून चालढकल केली जाणे, याबाबतीत वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून लाखो रुपयांची अपचारी कर्मचाऱ्यांकडून वसुली करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४८) | ५४७६ | १० | राष्ट्रीय हरित लवादाने पर्यावरण विषयक नियमांच्या उल्लंघनाबाबत एकीकडे राज्याला 12000 कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या वनविभागात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सतरा हजार झाडांचा बळी देण्याचा निर्णय वनमंत्रांच्या उपस्थितीत घेतला असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, एकीकडे राज्यात 18 नवीन आणि सात प्रस्तावित संवर्धन राखीव वनक्षेत्रे घोषित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असताना त्याच वेळेस यवतमाळ मधील पांढरकवडा वनविभागात लाईम-स्टोन उत्खननासाठी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या व्याघ्रभ्रमण मार्गातील तब्बल 17000 झाडांचा बळी घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणे, व्याघ्र भ्रमण मार्गात ज्या खाजगी प्रकल्पांना वन्यजीव मान्यता आवश्यकता आहे त्यांच्याकडून बाधित क्षेत्रातील प्रकल्प किमतीच्या दोन टक्के रक्कम वन्यजीवांच्या संवर्धनासाठी जमा करणे आवश्यक असणे परंतु सदरहू यंत्रणांकडून चार टक्के रक्कम घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेणे घेतलेला असणे, पैस्यापेक्षा वने आणि वन्यजीव पर्यावरण महत्वाचे असताना या प्रकल्पासाठी झाडांवर कुऱ्हाड चालवण्याच्या निर्णयामुळे राज्यातील पर्यावरण वाद्यांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, पर्यावरण प्रेमींकडून खान प्रकल्प टाळण्याबाबत केल्या जात असलेल्या सूचनांकडे व प्रकल्पाचे क्षेत्र व्याघ्रभ्रमणात येत असल्यामुळे या भागात खाणकाम सुरू करण्यापूर्वी खानकामाचे क्षेत्र पुनर्भरण करणे आवश्यक असताना हिंदुस्तानी वन्यजीव संस्थेच्या अभ्यासानुसार परिसरातील वाघांचे अस्तित्व असलेल्या क्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या शिफारशीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना |
| (४९) | ५४७७ | १० | मौजे डॉक्टरवाडी (जुनी बाभुळवाडी) ता.नांदगाव जि.नाशिक येथील सर्व्हे नं.10 (सद्याचा गट क्र.26) या राखीव वनजमिनीची बेकायदेशीररित्या विक्री झालेली असणे, 7/12 वर राखीव वने अशी स्पष्ट नोंद असलेल्या भोगवटादार वर्ग-2 / नविन अविभाज्य शर्तीची असलेल्या या जमिनीची विक्री करताना केंद्र शासनाची व मा.सर्वोच्च न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक असताना ती घेण्यात आलेली नसणे, राखीव वन जमिनीच्या संरक्षणामध्ये कसूर ठेवून कर्तव्यात दुर्लक्ष केले प्रकरणी वनपरीक्षेत्र अधिकारी व वनरक्षक यांना निलंबित केले असले तरी प्रकरणाची व्याप्ती पाहता यामध्ये बरेच मोठे अधिकारी व पदाधिकारी यांचा सहभाग असल्याची शक्यता असणे, उपवन संरक्षक यांनी या बाबतीत तक्रार करून जमिनीची परस्पर विक्री करून टी.पी.सौर्य.लि. अशी जमिनीची मालकी लावणाऱ्याच्या विरोधात व खेरदी करणाऱ्या विरोधात भारतीय वनसंवर्धन अधिनियम- 1980 अंतर्गत कार्यवाही करण्याची मागणी केलेली असणे, सदर जमिन 1963 पासून नॉनफॉरेस्ट करून वाटप करण्यात असल्याचीही बाब समोर आलेली असणे, या प्रकरणी शासनाने त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींवर कार्यवाही करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (५०) | ५५६७ | १० | मु. मांढळ,ता.कुही जि.नागपूर येथील राहीवाश्याच्या दुकान आणि राहते घरात दि.3/12/2022 ला शेताकडून व गावालगत असलेल्या तलावाच्या बाजूने वन्यजीव रानडुक्कर शिरले होते. रानडुक्करांनी तेथील रहीवाश्यांच्या दुकान व घरातील संपूर्ण साहित्यांची तोडफोड केली. संबंधित साहित्याच्या यादीची लिस्ट पंचनामा करुन वनपरिक्षेत्र अधिकारी, (उत्तर उमरेड) यांनी यादीनुसार एकूण 10,98,200/- फोटो स्टुडिओ मधील किंमती वस्तूचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यात नमूद आहे. दुकानातील सामानांची नासधुस, वन्यप्राणी रानडुकरामुळे झाली. त्यामुळे त्यांचा व्यवसाय वन्यप्राण्याच्या धुमाकुळीमुळे बंद झाला. त्यामुळे प्रकरणार्थी नुकसान भरपाई मिळणे आवश्यक असतांनासुध्दा आजतागायत नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त झाली नाही. परिणामी त्यांचा संसार उघडयावर पडला असून उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्यामुळे उपासमारी होत आहे. यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (५१) | ५५२० | १० | नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील डॉक्टरवाडी आणि पांझणगाव येथील वन क्षेत्रातील जमीनीचे प्रकरण ताजे असताना आता बागलाणमध्येही ५५ एकर वन जमीन विक्री करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आलेला असणे, दिल्लीच्या खासगी कंपनीने या जागेवर सौर प्रकल्प उभा केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, नांदगाव तालुक्यातील डॉक्टरवाडीमध्ये ३०० एकर वन जमिनीचा परस्पर व्यवहार करून तेथे सौर प्रकल्प उभारण्याचे काम मोठ्या थाटात सुरू झालेले असणे, याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरून चौकशी सुरू असतानाच असेच तिसरे प्रकरण बागलाण तालुक्यात उघडकीस आल्याने खळबळ उडालेली असणे, ताहराबाद वन परीक्षेत्रामधील बैसाणे येथील राखीव वन कक्ष क्र. १६३ मध्ये गट नं. १६७ मधील ५५ एकर वनजमिनीची परस्पर विक्री करून तिथेही सौरऊर्जा प्रकल्प उभारणी झाल्याचे उघडकीस आणलेले असणे, बैसाणे गावातील ५५ एकर वनजमिनीची परस्पर अवैध मार्गाने खरेदी करून याठिकाणी दिल्लीच्या एका कंपनीने १० मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प साकारलेला असणे, त्याचप्रमाणे नाशिक शहरानजीक असलेल्या म्हसरूळ, चेहडी बु. सह इतर ठिकाणच्या वन जमिनींचे हस्तांतरण करून "राखीव वन" ही नोंदच गायब केल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये उघडकीस आलेले असणे, वन क्षेत्रामधील चिमूटभर माती उचलली तरी कारवाईला सामोरे जावे लागत असणे,असे असतांना नाशिक जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये शेकडो एकर वन जमिनींमध्ये घुसखोरी करूनही वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष केलेले असणे, जिल्ह्यातील जमिनींची सखोल चौकशी केल्यास इतर ठिकाणी सुद्धा अशी प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता असणे, या वन जमिनींच्या प्रकरणामध्ये मोठे रॅकेट असण्याचा संशय असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळे या प्रकरणांची उच्चस्तरीय यंत्रणेकडून चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (५२) | ५३९६ | १०० | जिल्ह्यातील नायगाव-मयूर येथे मयूर अभयारण्य अस्तित्वात असणे व या वन क्षेत्रात मोरांसह अनेक वन्य प्राण्यांचा वावर असणे, या वनातील मोरांच्या संख्येत विविध कारणांनी सातत्याने मोठ्या प्रमाणात घट होत असल्याच्या तक्रारी वन प्रेमी नागरिकांनी केल्या असणे, सदर वन क्षेत्रात मोरांचे संवर्धन व जतन करण्यासाठी विशेष तज्ज्ञांचे पथक नेमून ग्रीन फिल्ड विकसित करण्याची होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही. |
| (५३) | ५३९८ | १०० | जिल्ह्यातील बिंदुसरा धरणाच्या परिसरात पाली गावालगत वन विभागाच्या जमिनीत शांतीवन हे वन उद्यान विकसित करण्यात येत असणे, या ठिकाणी औषधी वनस्पती लावणे, सुशोभीकरण व अन्य कामांसाठी निधीची मागणी प्रस्तावित असणे, या ठिकाणी वन उद्यान विकसित करून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी निधीची होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (५४) | ५३७९ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यामध्ये सुमारे १६७४ हेक्टर आर वनजमिनी असून या वन जमिनीवरील पाझर, साठवण, तलावासाठी सर्व्हे करुन साईड ठरविण्याची आवश्यकता असून त्यामुळे पाण्याची उपलब्धता होण्याची शक्य असणे, यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.